पारधी समाजासाठी घ्यावयाच्या विविध
<u>योजनांसाठी निधी मंजूर करणे.</u>

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-पारधी-२००८/प्र.क्र.३७/का.१७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १४ ऑक्टोबर,२००८.

पहा:-१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक - पुमाप्र- २००६/ प्र.क्र.१५२/का.१७ दिनांक ५ मार्च, २००७

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्रमांक - बीयुडी-२००८/ प्र.क्र.४५/का.७ दिनांक ८ ऑगस्ट, २००८

**शासन निर्णय:-** पारधी समाज हा आदिवासी समाजात अंतर्भूत असून आदिवासींसाठी असलेल्या आदिवासी विकासाच्या विविध योजना सदर समाजासाठीही लागू आहेत. मात्र, काही तांत्रिक अडचणीमुळे पारधी समाजातील लोकांना त्याचा लाभ मिळत नव्हता. त्यासाठी राज्यातील अनुसूचित जमातीमधील पारधी समाजाच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२०-९-२००६ रोजी बैठक घेण्यात आली होती, सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रथम प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रातील पारधी समाजातील लोकांना विविध योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी, पुरवणी मागणीव्दारे तरतूद करण्यात येऊन शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्र.पुमाप्र-२००६/प्र.क्र.१५२/का.१७, दि.५ मार्च,२००७ अन्वये रु.८९२.२५ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला होता. सन २००८-०९ मध्ये पारधी समाजासाठी विविध योजना अंमलात आणण्यासाठी पुरवणी मागणीव्दारे रु. २५०० लक्ष एवढया निधीची तरतूद करण्यात आली असून सदर निधी शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्र-बीयुडी-२००८/प्र.क्र.४५/का.७,दिनांक ८ ऑगस्ट, २००८ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिनस्त ठेवण्यात आला आहे. सदर निधीपैकी रु. १६०० लक्ष ( अक्षरी रुपये सोळाशे लक्ष फक्त ) इतका निधी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना राज्यातील विविध जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजासाठी पुढील योजना राबविण्यासाठी खर्च करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

आदिवासी पारधी समाजासाठी घ्यावयाच्या विविध योजना :-

(रु. लाखात )

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा उद्येश | लाभार्थी संख्या | प्रति लाभार्थी खर्च रुपये | मंजूर तरतूद रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | भूमिहीन पारधी जमातीच्या कुटूंबाना स्वाभिमान/ सबळीकरण योजना. | भूमिहीन कुटूंबाना या योजनेत २ एकर बागाईत किंवा ४ एकर जिराईत शेतजमीन देणे. | ३०० | २.०० | ६००.०० |

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा उद्देश | लाभार्थी संख्या | प्रति लाभार्थी खर्च रुपये | मंजूर तरतूद रुपये |
|---|---|---|---|---|---|
| २ | पारधी समाजासाठी शेळी गटाचा पुरवठा करणे, | शेतीला पुरक व्यवसाय म्हणून उत्पन्नाचे साधन म्हणून १० शेळया व १ बोकडांचा गट पुरविणे | ५४६ | ०.२५ | १३६.५० |
| ३ | आदिवासी पारधी शेतकऱ्यांना विहीर, मोटारपंप व पाईपलाईन देणे. | कोरडवाहू जमीनीत शेतीसाठी पुरेसे उत्पन्न होत नसल्याने विहीर खणून त्यावर पंप व पाइपलाईन देणे. | १५० | १.०० | १५०.०० |
| ४ | सिंचनासाठी विहीर विजपंप/तेलपंपाचा पुरवठा करणे. | ज्या पारधी शेतक-यां जवळ विहीर आहे परंतू वीजपंप नाही अशा शेतक-यांना पुरवठा करणे. | विजपंप--७५<br>तेलपंप-७५ | ०.३०<br>०.२० | २२.५०<br>१५.०० |
| ५ | सिंचनासाठी एच.डी.पी.ई. पाईपाचा पुरवठा करणे. | विहीर व पंपधारक पारधी शेतक-यांना सिंचनासाठी आधुनिक एचडीपीई पाईपचा पुरवठा करणे | २०० | ०.२५ | ५०.०० |
| ६ | दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे. | दुधाळ म्हशींचा पुरवठा करुन त्यांना उत्पन्नाचे साधन मिळवून देणे. | २०० | ०.४० | ८०.०० |
| ७ | पिठाच्या गिरणी शेडसह बसवून देणे. | पिठ गिरणी यंत्र शेडसह बसवून देणे. | ७५ | १.०० | ७५.०० |
| ८ | सायकलचा पुरवठा करणे. | सुशिक्षित बेरोजगारांना प्रति लाभार्थी १० सायकली देवून त्या भाडयाने देण्यासाठी उपलब्ध करणे. | ९० गट | ०.२०<br>प्रति गट | १८.०० |
| ९ | मळणी यंत्राचा पुरवठा करणे. | शेतीव्यवसाय करीत असलेल्या पारधी कुटुंबांना मळणी यंत्राचा पुरवठा करणे व त्यांच्या उत्पन्नाच्या साधनात वाढ करणे. | ७५ | ०.४० | ३०.०० |

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा उद्येश | लाभार्थी संख्या | प्रति लाभार्थी खर्च रुपये | मंजूर तरतूद रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १० | स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी किराणा दुकानांसाठी अर्थसहाय्य देणे. | स्वयंरोजगाराचे एक नवीन साधन म्हणून दैनंदिन गरजेच्या वस्तुचे किराणा दुकान सुरु करण्यासाठी सहाय्य करणे. | ७५ | ०.५० | ३७.५० |
| ११ | पारधी महिलांना शिवणकलेचे प्रशिक्षण देऊन शिवणयंत्राचा पुरवठा करणे. | पारधी महिलांना शिवण कलेचे प्रशिक्षण देऊन व्यवसायासाठी शिवणयंत्रे पुरविणे. | ३०० | ०.०५ | १५.०० |
| १२ | कृषिनिविष्ठा शेती अवजारे पुरविणे, | पारधी शेतक-यांना कृषि संबंधीत शेती अवजारे पुरविणे. | ३०० | ०.०६ | १८.०० |
| १३ | पारधी कुटूंबांना रोजगारासाठी / व्यवसायासाठी अर्थसहाय्य करणे. | रु.२५०००/- पर्यंतचे व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य देणे. | २०० | ०.२५ | ५०.०० |
| १४ | कुक्कटपालन व्यवसाय. | कुक्कट पालन व्यवसायासाठी जागा, इमारत, पक्षी खरेदी, पक्षी खाद्य वैद्यकिय सुविधेसाठी अर्थसहाय्य देणे. | ५० | ३.०० | १५०.०० |
| १५ | स्टॉल पुरवून व्यवसाय उपलब्ध करुन देणे. | जागा इमारत टीनाचे पत्रे पुरवून व्यवसायासाठी रोजगार उपलब्ध करुन देणे. | १५० | १.०० | १५०.०० |
| १६ | जागृती मेळावे आयोजित करणे. | पारधी समाजामध्ये जागृती करुन शासनाच्या विविध लाभांच्या योजनांची माहिती देण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करणे. | १० | ०.२५ | २.५० |
| | एकूण | | | | १६०० |

२. यावरील खर्च शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्रमांक- बीयुडी-२००८/ प्र.क्र.४५/ का.७,दिनांक ८ ऑगस्ट, २००८ सोबत जोडलेल्या कॅशफ्लो प्रमाणे संबंधित अर्थशिर्षाखाली करण्यात यावा.

३. पारधी समाजासाठी घरकुल योजनेसंबंधात अर्थसंकल्पीत करण्यात आलेला रु. २००.०० लक्ष निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

४. उपरोक्त योजना राबवितांना त्या जिल्ह्यातील पारधी समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना लाभ देण्यात यावा. लाभार्थी निवड संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित पोलीस अधिक्षक यांच्या सहमतीने करावी. योजनेच्या कार्यपध्दती इत्यादी बाबतची कार्यवाही यासोबतच्या जोडपत्र परिशिष्ट-१ ते १६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करण्यात यावी.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४७/०८/व्यय-१४ दि. ३ जुलै, २००८ व अनौचारिक संदर्भ क्र.१७५/०८/अर्थ-१९,दि.२३ जुलै, २००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००८१०१४१६२१३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. द. पडवळ)
अवर सचिव, आदिवासी विकास विभाग

प्रति,
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक (५ प्रति)
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे,/ नाशिक/ अमरावती/ नागपूर (प्रत्येकी २ प्रति)
मा.मंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव (आदिवासी विकास ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ /२, महाराष्ट्र, मुबई /नागपूर.
महालेखापाल (लेखापरिक्षा ) १ /२, महाराष्ट्र, मुबई /नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, कार्यासन (व्यय-१४/अर्थसंकल्प-१९) मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी कार्यासन ३,५, ७, ९, ११, १३, १६ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,का.१७,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

# पारधी समाजाच्या विकासाच्या योजना

## परिशिष्ट-१

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **स्वाभिमान सबळीकरण योजना** |
| २ | **लाभार्थ्यांची संख्या** | ३०० आदिवासी पारधी कुटुंबे. |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.भूवायो-२००३/ प्र.क्र.१४२/ का.९, दि.२४ फेब्रुवारी २००४ व शासन शुध्दिपत्रक क्र.२५-११-२००५ अनुसार प्रति लाभार्थी, जमिन देण्यात येईल. ३०० लाभार्थी प्रतिलाभार्थी रु. २ लक्ष प्रमाणे रु.६०० लक्ष खर्च |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/ अंमलबजावणी अधिकारी** | संबंधीत जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास,व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | ज्या आदिवासी पारधी शेतकरी कुटुंबांकडे स्वतःची जमीन नाही, परंतु दुस-याच्या शेतावर काम करतात, अशा भूमिहीन आदिवासी पारधी कुटुंबाना स्वयंरोजगारासाठी शेतजमीन उपलब्ध करुन देणे. |
| ७ | **लाभार्थ्यांची निवड पध्दती** | १. आदिवासी पारधी शेतकरी कुटुंबांकडे स्वतःची जमीन नाही, परंतु दुस-याच्या शेतावर काम करतात, अशी भूमिहीन आदिवासी पारधी कुटुंबे,<br>२. आदिवासी पारधी कुटुंब हे दारिद्र्य रेषेखालील असावे.<br>३. इतर कोणाकडूनही अशा योजनेचा लाभ त्या कुटुंबास पूर्वी देण्यात आलेला नसावा.<br>४. लाभार्थी निवड प्रक्रिया शासन शुध्दीपत्रक क्र. भूवायो-२००३/ प्र.क्र.१४२/का.९ दि.२५-११-२००५ अनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती करेल.<br>५. आदिवासी पारधी समाजातील विधवा व परित्यक्त्या स्त्रियांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी कुटुंबांशी संबंधीत जिल्हे. |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.भूवायो-२००३/प्र.क्र.१४२/का.९, दि.२४ फेब्रुवारी २००४ व शासन शुध्दिपत्रक क्र. .भूवायो-२००३/प्र.क्र.१४२/ का.९, दि२५-११-२००५ अनुसार राहील. |
| १० | **योजनेचा कालावधी** | २००८-२००९ |
| ११ | **योजनेतील अटी व शर्ती** | १. आदिवासी पारधी लाभार्थ्यांच्या नावे जमिन नोदणी,मोजणी, इत्यादीचा खर्च शासन शुध्दिपत्रक क्र. भूवायो-२००३/प्र.क्र. १४२/ का.९, दि.२५-११-२००५ अनुसार राहील.<br>२. लाभार्थ्यास ही जमिन विकता/हस्तांतर अथवा भाडेपट्टीने देता येणार नाही. तसे आढळल्यास त्याविरुध्द गुन्हा नोदविण्यात येईल.<br>३. सदर जागेवर आदिवासी विकास विभागाच्या निधीतून लाभार्थ्यास मिळाली असल्याचा कायम स्वरुपी फलक लावण्यात यावा. |

## परिशिष्ट - २

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **अनुसूचित जमातीच्या पारधी कुटुंबांना १० शेळया व १ बोकड यांचा गट पुरविणे** |
| २ | **योजनेतील लाभार्थी संख्या** | ५४६ आदिवासी पारधी कुटुंबे |
| ३ | **योजनेसाठी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक** | अ) १० शेळया व १ बोकड याप्रमाणे एका युनिटसाठी रु.२०,०००/-<br>ब) चारा,प्रशिक्षण व कच्चे शेड, विमा व औषध उपचारासाठी प्रती युनिट रु. ५०००/- वरील "अ व ब" मिळून एका युनिटसाठी अपेक्षित खर्च रु. २५,०००/- याप्रमाणे एकूण ५४६ युनिट लाभार्थ्यासाठी रु. १३६.५० लक्ष खर्च अपेक्षित. |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/ अंमलबजावणी अधिकार** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश/ हेतू** | पारधी जमातीच्या व्यक्तींना शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून त्यांना दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी यांनी योजनेच्या अटी व शर्तीनुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या सल्ल्याने लाभार्थीची निवड करावी. |
| ८ | **योजनेची कार्यपध्दती** | लाभार्थी ( कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रु. २०,०००/- च्या आतील ) पारधी जमातीतील असावा. प्रकल्प अधिकारी हे योजनेच्या अटी व शर्तीनुसार योग्य त्या लाभार्थ्यांची निवड करतील. योजनेसाठी मंजूर निधी प्रकल्प अधिकारी यांच्या स्तरावर अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्यामार्फत ठेवण्यात येईल. प्रकल्प अधिकारी हे जिल्हा पशुसंवर्धन व विकास अधिकारी यांच्या मदतीने व सल्ल्याने शेळया व बोकड तसेच पशुखाद्य खरेदी करुन लाभार्थ्यांना स्थानिक लोकप्रतिनिधीच्या हस्ते वाटप करतील. |
| ९ | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| १० | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) दुर्गम भागातील पारधी जमातीच्या कुटुंबातील शेत मजूर/भूमिहीन असावे. वार्षिक रु. २०,०००/- च्या मर्यादेत उत्पन्न असलेल्या पारधी कुटुंबास प्राधान्य देण्यात यावे.<br>२) लाभार्थी कुटुंबाकडे किमान ३०० चौ. मि. स्वत:ची जागा असावी.<br>३) प्रकल्प अधिकारी यांनी त्या कुटुंबास अन्य कोणत्याही योजनेतंर्गत आर्थिक विकासासाठी लाभ मिळालेला नाही याची खात्री करावी.<br>४) शेळया व बोकडांची खरेदी स्थानिक बाजारातून जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या मार्गदर्शना खाली करतील.<br>५) लाभार्थी कुटुंबास ही जनावरे विकता येणार नाहीत. तसे केल्यास त्या दोषी मानून त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा.<br>६) प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी महिन्यातून किमान एकदा या प्रकल्पाच्या ठिकाणी भेट द्यावी.<br>७) शेळया निवाराच्या ठिकाणी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पारधी जमातीसाठी योजना असा फलक लाभार्थ्याने लावणे आवश्यक राहील. |

## परिशिष्ट -३

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **आदिवासी पारधी शेतक-यांना विहिर, मोटारपंप व पाईपलाईन देणे.** |
| २ | **लाभार्थी संख्या** | १५० लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | रु. १,००,०००/- ( अक्षरी रु. एक लाख फक्त ) प्रती विहिर प्रमाणे १५० लाभार्थ्यासाठी १५० X १,००,०००/- = १५०,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे पन्नास लाख रुपये फक्त) वीजपंप/ तेलपंप, पी.व्ही.सी. पाईपलाईनसहीत |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | ज्या पारधी जमातीच्या शेतक-यांची शेतीसाठी पाण्याची गैरसोय आहे अशा लाभार्थ्यास त्याची शेतजमिन ओलीताखाली आणणेसाठी शेतात नवीन विहिरी खोदणी व शेतात विहिरीवर वीजपंप/तेलपंप बसविण्यात येऊन पाण्यासाठी पाईपलाईन करुन दिली जाईल त्यामुळे त्यांच्या पारंपारीक शेतीमध्ये बदल घडवून आधुनिक पध्दतीने शेती केल्यास त्याचे कृषि उत्पन्न वाढविण्यास मदत होईल पर्यायाने त्याची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारेल. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी भूजल व विकास यंत्रणा यांचेकडे पाठवून विहिरीकरिता योग्यतेचा दाखला प्राप्त करुन पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **कार्यपध्दती** | गावातील पात्र लाभार्थ्यास विहिर बांधकाम व खोदकाम खाजगी मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था अथवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता सहकारी संस्था यांचेमार्फत करुन देण्यात येईल पहिला हप्ता विहिरीसाठी रु. ३०,०००/- प्रकल्प अधिकारी हे अदा करतील त्यानंतर कामाची प्रगती पाहून रु. ३०,०००/- दुसरा हप्ता म्हणून अदा करतील व विहिरीचे पूर्ण काम झाल्यानंतर उर्वरित रक्कमेमध्ये मोटारपंप व पाईपलाईन करण्यासाठी दर करारपत्रकानुसार साहित्य खरेदी करण्यात येईल. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी पारधी जमातीचा व दारिद्रय रेषेखालील असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) स्वत: ची शेतजमिन असावी.<br>४) जमिनीचा ७/१२ व नमुना अ चा उतारा व जमिनीच्या चतुर्सिमा नकाशा असावा.<br>५) पाणी उपलब्धतेबाबत भूजल विकास सर्वेक्षण यंत्रणेचा दाखला घेणे आवश्यक राहील.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट -४

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | पारधी जमातीच्या शेतक-यांसाठी वीजपंप/तेलपंप पुरवठा करणे |
| २ | लाभार्थी संख्या | ७५ लाभार्थी वीजपंप व ७५ लाभार्थी तेलपंप याप्रमाणे एकुण १५० लाभार्थी |
| ३ | योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक | ३ ते ५ अश्वशक्तीचा वीजपंप स्टार्टर, मेन स्विच, केबल, मजूरी इत्यादी सर्व खर्चासह एक युनिट रु. ३०,०००/- प्रति युनिट प्रती लाभार्थी प्रमाणे ७५ वीजपंपासाठी रु.२२,५०,०००/- आणि तेलपंपासाठी प्रती तेलपंप रु.२०,०००/- प्रमाणे ७५ तेलपंपासाठी रु. १५,००,००० इतका खर्च अपेक्षित. |
| ४ | योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित |
| ५ | नियंत्रक अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | योजनेचा उद्देश | पारधी लाभार्थींच्या शेतात विहिर असल्यानंतर त्यांची संपूर्ण जमीन ओलीताखाली आणणेसाठी विहिरीतील पाणी वीजपंप अथवा तेलपंपाव्दारे उपसा करुन पारधी आदिवासी शेतकरी आपल्या शेतातील पिकांना चांगल्याप्रकारे व वेळेवर पाणी देवून शेतीच्या उत्पन्नात वाढ करुन आपली आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती उंचावून राहणीमान सुधारण्यास मदत होईल हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. |
| ७ | लाभार्थी निवड पध्दती | प्रकल्प अधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | योजनेचे कार्यक्षेत्र | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | कार्यपध्दती | सदर योजनेसाठी प्रकल्प अधिकारी हे लाभार्थी निश्चित करुन व पाण्याचे स्त्रोत उपलब्ध झाल्यानंतर पाण्याच्या स्त्रोत क्षमतेच्या तुलनेत कमी अधिक अश्वशक्तीचा लागणारा वीजपंप अथवा तेलपंप साहित्य महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत खरेदी करुन देतील. |
| १० | योजनेचा कालावधी | सन २००८-०९ |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) लाभार्थी पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) स्वतः ची शेतजमिन असावी. व ती कमीत कमी १.५ एकर असावी.<br>४) जमिनीचा ७/१२ व नमुना अ चा उतारा व जमिनीच्या चतुर्सिमा नकाशा असावा.<br>५) लाभार्थ्याचे शेतात विहिर असणे आवश्यक आहे.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावी. |

## परिशिष्ट -५

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **पारधी शेतक-यांना शेतीसाठी एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करणे.** |
| २ | **लाभार्थी संख्या,** | २०० लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | प्रती लाभार्थी दरपत्रकात प्राप्त झालेल्या दरानुसार अंदाजित रु. २५०००/- मर्यादेत २० फुटाचे पाईप प्रमाणे एकूण २०० लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल यासाठी एकूण २०० X २५००० = ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त ) खर्च अपेक्षित |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व.आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | बहुतांश पारधी शेतक-यांकडे शेती असून कार्यालयामार्फत ऑईलपंप व विजपंपाचा पुरवठा त्यांना करण्यात येतो त्यानुसार अशा आदिवासी शेतक-यांना सिंचनासाठी एच.डी.पी.ई. पाईपची आवश्यकता असते यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल करिता अशा गरजू पारधी आदिवासींना एच. डी. पी. ई. पाईपचा पुरवठा करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे संभाव्य पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **कार्यपध्दती** | पारधी जमातीच्या शेतक-यांकडे सिंचनासाठी विहिर, मोटरपंप/आईल इंजिन असल्यानंतर त्यांच्या आवश्यकतेनुसार एच.डी. पी.ई. पाईपचा पुरवठा करण्यासाठी दरकरारपत्रकानुसार खरेदी करुन करण्यात येईल. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थ्याकडे स्वत:ची शेती व सिंचनाची सोय उपलब्ध असणे आवश्यक आहे.<br>३) वाटप केलेले साहित्य लाभार्थ्यास विक्री अथवा गहाण ठेवता येणार नाही.<br>४) कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. २०,०००/- चे मर्यादेत असावे.<br>५) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

[illegible](1000-10-2008)-5

## <u>परिशिष्ट -६</u>

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **अनुसूचीत जमातीच्या पारधी लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे ( प्रती लाभार्थ्यास २ म्हशी याप्रमाणे गट)** |
| २ | **लाभार्थी संख्या** | २०० लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | दर्जेदार म्हशी :- रोज किमान ७ ते ८ लिटर दुध देणारी व साधारणतः १९६० ते २२४० अंश स्निग्धांश असलेल्या २ म्हशीची किंमत रु. ४०,०००/- यामध्ये किमान ६ महिन्याचा चारा, विमा वाहतुक खर्च इ. समावेश आहे. प्रती लाभार्थी रु. ४०,०००/- याप्रमाणे २०० लाभार्थ्यांसाठी एकूण रु. ८० लक्ष खर्च अपेक्षित. |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प/ जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद/जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | आदिवासी हे दुर्गम व डोंगराळ भागात रहात असल्याने दुधाळू जनावरांचा पुरवठा केल्याने महिलांना दुग्धव्यवसाय करतायेऊन कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारु शकेल. तसेच दुध हे पूर्णान्न असल्यामुळे कुटुंबातील लहान मुलांना दुध मिळाले तर दुधाव्दारे पोषक घटक मिळू शकतील व त्यामुळे कुपोषण/भुकबळी इ. घटना घडणे टळू शकतील. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे संभाव्य पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | १) प्रकल्प अधिकारी हे योजनेच्या विहित अटी शर्तीनुसार लाभार्थी निवड करतील.<br>२) योजनेसाठी आवश्यक निधी प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावर अपर आयुक्त, यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>३) प्रकल्प अधिकारी हे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा व्यवसाय विकास अधिकारी यांचे मदतीने व सल्ल्याने म्हशी तसेच पशुखाद्या खरेदी करुन स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेहस्ते लाभार्थ्यांना वाटप करतील. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) सदर योजनेचा लाभ यापूर्वी संबंधित लाभार्थ्याने घेतला नसल्याबाबत प्रकल्प अधिकारी यांनी प्रथम खात्री करावी व तद्नंतरच लाभ देण्यात यावा.<br>३) सदर योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कार्डधारक आदिम जमाती/परितक्त्या व विधवा महिला यांना प्रामुख्याने प्राधान्य देवून देण्यात यावा.<br>४) जिल्हा परिषद अंतर्गत सदर योजनेचा लाभ यापूर्वी घेतलेला नसावा. |

## पारधी समाजाच्या विकासाच्या योजना

## परिशिष्ट -७

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **पारधी जमातीच्या सुशिक्षीत बेरोजगार युवकांना शेड बांधकामासह पीठ गिरणीचा पुरवठा करणे.** |
| २ | **लाभार्थी संख्या** | ७५ पारधी लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | प्रती लाभार्थी रुपये १,००,०००/- शेडबांधकामाप्रमाणे एकूण ७५ लाभार्थ्यांसाठी रु. ७५,००,००० ( अक्षरी रुपये पंच्याहत्तर लाख फक्त ) |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | पारधी समाजामध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकामधून पात्र लाभार्थ्यांची निवड करतील व प्राप्त दर करारपत्रकानुसार पीठ गिरणी साहित्याची खरेदी करण्यात येईल. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थ्यांकडे शेड बांधकाम करण्यासाठी स्वत:ची जमीन असणे आवश्यक आहे<br>३) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>४) लाभार्थी हा सुशिक्षित बेरोजगार असावा.<br>५) लाभार्थ्यांचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे २०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>६) लाभार्थ्याने पीठ गिरणीच्या दुकानावर " आदिवासी विकास विभाग यांचे निधीतून" असे नामफलक लावणे आवश्यक राहील.<br>७) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट -८

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | दारिद्रय रेषेखालील पारधी जमातीच्या बेरोजगार युवकांना दुचाकी सायकल रिपेअरींग व सायकल भाडयाने देण्याकरिता सायकलचा पुरवठा करणे |
| २ | लाभार्थी संख्या | ९० पारधी लाभार्थी |
| ३ | योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक | प्रती लाभार्थी १० सायकल एकूण ९० लाभार्थ्यासाठी १०X ९० = ९०० सायकलचा पुरवठा करण्यात येईल यासाठी प्रती सायकल रु. २,०००/-प्रमाणे रु. २०००X ९०० = १८,००,०००/- ( अक्षरी रुपये अठरा लाख फक्त ) |
| ४ | योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे योजना राबविणारे अधिकारी राहतील. |
| ५ | नियंत्रक अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | योजनेचा उद्देश | पारधी समाजामध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| ७ | लाभार्थी निवड पध्दती | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | योजनेचे कार्यक्षेत्र | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | योजनेची कार्यपध्दती | प्राप्त दर करार पत्रकानुसार दुचाकी सायकलची खरेदी करण्यात येईल व प्रती लाभार्थीस १० सायकलीचा पुरवठा याप्रमाणे एकूण ९० लाभार्थींना ९०० सायकल खरेदी करण्यात येऊन वाटप करण्यात येईल. |
| १० | योजनेच्या कालावधी | सन २००८-०९ |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) लाभार्थी हा सुशिक्षित बेरोजगार असावा.<br>४) लाभार्थ्यांचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे २०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>५) लाभार्थ्याने सायकल दुकानावर आदिवासी विकास विभाग यांचे निधीतून असे नामफलक लावणे आवश्यक राहील.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट -९

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **पारधी जमातीच्या शेतक-यांना शेतीसाठी मळणी यंत्राचा ( थ्रेशर मशिन ) ५ एच.पी. मोटार व इतर सर्व साहित्यासह पुरवठा करणे ( आय.एस.आय. मार्क )** |
| २ | लाभार्थी संख्या | ७५ पारधी लाभार्थी. |
| ३ | योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक | प्रती लाभार्थी दरकरारपत्रकात प्राप्त झालेल्या दरानुसार अंदाजित किंमत ५ एच.पी. मोटारसह ४०,०००/- चे मर्यादेत प्रती नमप्रमाणे एकूण ७५ लाभार्थींना लाभ देण्यात येईल यासाठी एकूण रु. ७५ X ४०,००० = ३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख फक्त ) |
| ४ | योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | नियंत्रक अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | योजनेचा उद्देश | बहुतांश पारधी शेतक-यांकडे शेती असून शेतीमधील अन्नधान्याचे उत्पन्न काढणेसाठी इतरांकडून मळणीयंत्र आणावे लागते यासाठी मळणीयंत्र भाडे, वाहतुक खर्च मोठ्या प्रमाणावर होतो करीता त्यांना मळणी यंत्राचा पुरवठा केल्यास स्वतःच्या शेतीसाठी वापर करुन वेळ व पैसा वाचवू शकेल व आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल या योजनेचा मुख्य उद्देश आहे. |
| ७ | लाभार्थी निवड पध्दती | प्रकल्प अधिकारी हे संभाव्य पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | योजनेचे कार्यक्षेत्र | पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | योजनेची कार्यपध्दती | ज्या पारधी आदिवासी शेतक-यांकडे स्वतःची शेत जमिन असेल अशा पात्र लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना दरकरारपत्रकानुसार मळणी यंत्राची खरेदी करुन मळणी यंत्र पुरवठा करण्यात येईल. |
| १० | योजनेचा कालावधी | सन २००८-०९ |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थ्यांकडे स्वतःची शेती असणे आवश्यक आहे .<br>३) वाटप केलेले साहित्य लाभार्थ्यास विक्री अथवा गहाण ठेवता येणार नाही.<br>४) कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. २०,०००/-चे मर्यादित असावे.<br>५) मळणी यंत्रावर आदिवासी विकास विभाग असे लिहिणे आवश्यक राहील.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट - १०

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांना किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य करणे.** |
| २ | लाभार्थी संख्या | ७५ पारधी लाभार्थी |
| ३ | योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक | प्रती लाभार्थी रु. ५०,०००/- प्रमाणे एकूण ७५ लाभार्थ्यासाठी रु. ३७,५०,०००/- ( अक्षरी रुपये सदोतीस लाख पन्नास हजार फक्त ) |
| ४ | योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. |
| ५ | नियंत्रक अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | योजनेचा उद्देश | पारधी समाजामध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना उपजिविकेचे साधन म्हणून व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे.. |
| ७ | लाभार्थी निवड पध्दती | प्रकल्प अधिकारी हे संभाव्य पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | योजनेचे कार्यक्षेत्र | पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | योजनेची कार्यपध्दती | प्राप्त दर करारपत्रकानुसार किराणा साहित्याची खरेदी करण्यात येईल व प्रकल्प अधिकारी हे पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकामधून पात्र लाभार्थ्यांची निवड करतील व निवड झालेल्या लाभार्थ्याकडून किराणा दुकानासाठी आवश्यक असलेल्या मालाचे कोटेशन प्राप्त करुन घेऊन सादर केलेल्या कोटेशनप्रमाणे लाभार्थ्याला स्थापन केलेल्या प्रकल्प स्तरीय समितीमार्फत माल खरेदी करुन देण्यात येईल. |
| १० | योजनेचा कालावधी | सन २००८-०९ |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) लाभार्थी हा सुशिक्षित बेरोजगार असावा.<br>४) लाभार्थ्यांचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे रु.२०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>५) लाभार्थ्याचे किराणा दुकानासाठी भाडयाची अथवा स्वतःची जागा असणे आवश्यक आहे.<br>६) लाभार्थ्याने किराणा दुकानावर आदिवासी विकास विभाग यांचे निधीतून असे नामफलक लावणे आवश्यक राहील.<br>७) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व. अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट - ११

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **पारधी जमातीच्या महिलांना शिलाई कामाचे प्रशिक्षण देवून शिलाई यंत्र पुरवठा करणे.** |
| २ | **लाभार्थी संख्या** | ३०० महिला लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | सदर प्रशिक्षणासाठी प्रती लाभार्थी रुपये २०००/- ( सदर खर्चामध्ये प्रशिक्षकाचे मानधन, कच्चा माल, विद्यावेतन, व इतर खर्चाचा समावेश आहे.) व शिलाई मशिनची प्रती नग किंमत रुपये ३०००/- प्रमाणे एकुण रु.५०००/- याप्रमाणे ३००X ५००० = १५,००,००० /- ( अक्षरी रु. पंधरा लाख फक्त ) |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | राज्यातील अल्पशिक्षित अनु. जमातीच्या पारधी महिला उमेदवारांना स्वयंरोजगार उपलब्ध होऊन त्याचा समाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना कपडे शिलाईचे अल्पावधीचे प्रशिक्षण व शिलाई मशिन उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | प्रकल्प अधिकारी पात्र महिला पारधी लाभार्थीनींची यादी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडे देतील व शिलाई कामाचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याची प्रमाणपत्रे महिलांना प्राप्त झाल्यानंतर दरकरारपत्रकानुसार शिलाई यंत्राची खरेदी करण्यात येऊन पारधी महिला लाभार्थींना वाटप करण्यात येईल. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) महिला लाभार्थी हा पारधी जमातीची असावी.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) किमान शिक्षण इयत्ता ८वी पर्यन्त झालेले असावे.<br>४) उमेदवारांची निवड करतांना त्या विवाहीत असल्यास एका पाडयातून एकापेक्षा जास्त व एका गावातून ३ पेक्षा जास्त नसाव्यात.<br>५) शिलाई मशिनची दर पत्रकातील दरानुसार खरेदी करण्यात येईल अथवा निविदेव्दारे खरेदीची कार्यवाही करण्यात येईल त्यामुळे लाभार्थी संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट -१२

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **पारधी जमातीच्या शेतक-यांना कृषि निविष्ठा ( शेती औजारे ) पुरवठा करणे.** |
| २ | लाभार्थी संख्या | ३०० पारधी लाभार्थी |
| ३ | योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक | प्रती लाभार्थी रु. ६,०००/- प्रमाणे एकूण ३०० लाभार्थ्यांसाठी १८,००,०००/- ( अक्षरी रुपये अठरा लाख फक्त ) खर्च अपेक्षीत. |
| ४ | योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | नियंत्रक अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | योजनेचा उद्देश | पारधी समाजाच्या शेतक-याकडे शेतीसाठी आवश्यक असणारी औजारे उपलब्ध नसल्याने उदा. नागर, वखर,सरी पाडण्यासाठी मशिन इ. ते इतरांकडून मागवून आणतात परंतु सदर साहित्य त्यांना इतर जमातीचे लोक वेळेवर देत नसल्याने त्यांना मोठ्या संकटास सामोरे जावे लागते. त्यामुळे हे साहित्य त्यांना खरेदी करुन देण्यात येऊन त्याची होणारी गैरसोय व वेळेची बचत करुन त्यांना शेती चांगल्या प्रकारे करण्यास मदत करणे हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे. |
| ७ | लाभार्थी निवड पध्दती | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | योजनेचे कार्यक्षेत्र | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | योजनेची कार्यपध्दती | प्रकल्प अधिकारी हे पारधी जमातीच्या शेतक-यांमधून पात्र लाभार्थ्यांची निवड करुन प्रकल्प स्तरीय समितीमार्फत प्राप्त दर करारपत्रकानुसार शेती औजाराची खरेदी करुन साहित्याचे वाटत करण्यात येईल.. |
| १० | योजनेचा कालावधी | सन २००८-०९ |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थ्यांकडे स्वत:ची शेतजमीन असणे आवश्यक आहे.<br>३) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>४) लाभार्थ्याचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे रु.२०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>५) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट -१३

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **पारधी जमातीच्या सुशिक्षीत बेरोजगार युवकांना त्यांच्या निवडीनुसार व्यवसाय करण्यास अर्थसहाय्य करणे** |
| २ | **लाभार्थी संख्या** | २०० पारधी लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | प्रती लाभार्थी रु. २५,०००/-प्रमाणे एकूण २०० लाभार्थ्यांसाठी रु. ५०,००,०००/- ( अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त ) |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | पारधी समाजामध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे व त्याची उपजिविका चालविण्यासाठी त्यांना त्यांच्या निवडीनुसार व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य देणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकामधून पात्र लाभार्थ्यांची निवड करतील व लाभार्थ्यांनी सादर केलेल्या कोटेशन नुसार व्यवसाय करण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत समिती स्थापन करुन साहित्याची खरेदी करण्यात येईल. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) लाभार्थ्याचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे रु.२०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>४) लाभार्थ्याने आपल्या निवडीच्या व्यवसायाचे कोटेशन देणे आवश्यक राहील व व्यवसायाच्या जागी "आदिवासी विकास विभाग यांचे निधीतून" असे नामफलक लावणे आवश्यक राहील.<br>५) व्यवसायासाठी स्वतः ची अगर भाडयाची जागा आवश्यक आहे.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

**परिशिष्ट -१४**

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांना कुक्कुटपालन व्यवसाय अर्थसहाय्य करणे.** |
| २ | **लाभार्थी संख्या** | ५० पारधी लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | प्रती लाभार्थी रु. ३,००,०००/-प्रमाणे यामध्ये पक्षी खरेदी, पक्षी खाद्य, शेड बांधकाम व वैद्यकीय व वैद्यकीय सुविधांचा समावेश राहील एकूण ५० लाभार्थ्यांसाठी रु. ५०X ३००००० = १,५०,००,०००/- ( अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त ) |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन यांचेमार्फत सदर योजना राबविण्यात येईल. |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | पारधी समाजामध्ये लोकांना रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे व त्याची उपजिविका चालविण्यासाठी त्यांना कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य देणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | जिल्हा उपायुक्त, पशुसंवधन व प्रकल्प अधिकारी यांची समिती गठीत करुन समितीमार्फत प्रती लाभार्थी रु. ३,००,०००/- प्रमाणे अर्थसहाय्य दिले जाईल या अंतर्गत कोंबडयांची खरेदी, कोंबडयांचे खाद्य, लसीकरण व वैद्यकीय सुविधा, कुक्कुटपालनासाठी शेड ( इमारत ) बांधकाम इत्यादीचा समावेश राहील व प्रकल्प अधिकारी हे पारधी जमातीच्या मधून पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) लाभार्थी हा सुशिक्षित बेरोजगार असावा.<br>४) लाभार्थ्याचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे रु. २०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>५) लाभार्थ्याने आपल्या व्यवसायाच्या जागी "आदिवासी विकास विभाग यांचे निधीतून "असे नामफलक लावणे आवश्यक राहील.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## पारधी समाजाच्या विकासाच्या योजना

## परिशिष्ट -१५

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नांव** | **पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांना टिनाचे स्टॉल तयार करुन देवून व्यवसायासाठी कच्या मालाची खरेदी करण्यास अर्थसहाय्य करणे** |
| २ | **लाभार्थी संख्या** | १५० पारधी लाभार्थी |
| ३ | **योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक** | प्रती लाभार्थी रु. १,००,०००/-प्रमाणे यामध्ये टिन पत्राचा पुरवठा व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल यांचा समावेश राहील एकूण १५० लाभार्थ्यांसाठी रु. १५० X १,००,००० = १,५०,००,०००/- ( अक्षरी रु. एक कोटी पन्नास लाख फक्त) |
| ४ | **योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी** | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | **नियंत्रक अधिकारी** | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | **योजनेचा उद्देश** | पारधी समाजामध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराचे साधन उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| ७ | **लाभार्थी निवड पध्दती** | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | **योजनेचे कार्यक्षेत्र** | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | **योजनेची कार्यपध्दती** | प्राप्त दर करारपत्रकानुसार टिन पत्र्यांची खरेदी करण्यात येईल व त्याचे स्टॉल तयार करुन घेऊन लाभार्थ्यांच्या निवडीनुसार त्याला आवश्यक असणारा कच्चा माल प्रकल्प अधिकारी कार्यालयातीलं समितीमार्फत घेऊन दिला जाईल प्रकल्प अधिकारी हे पारधी जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांमधून पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| १० | **योजनेचा कालावधी** | सन २००८-०९ |
| ११ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) लाभार्थी हा पारधी जमातीचा असावा.<br>२) लाभार्थी हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील असावा.<br>३) लाभार्थी हा सुशिक्षित बेरोजगार असावा.<br>४) लाभार्थ्यांचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हे रु.२०,०००/- पेक्षा जास्त नसावे.<br>५) लाभार्थ्याने व्यवसायाच्या ठिकाणी "आदिवासी विकास विभाग यांचे निधीतून" असे नामफलक लावणे आवश्यक राहील.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

## परिशिष्ट - १६

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **पारधी समाजासाठी जागृती मेळावे आयोजित करणे.** |
| २ | लाभार्थी संख्या | १० मेळावे |
| ३ | योजनेच्या खर्चाचे अंदाजपत्रक | प्रती मेळावा रु. २५,०००/- प्रमाणे एकूण १० मेळाव्यासाठी रु. २,५०,०००/- ( अक्षरी रु. दोन लक्ष पन्नास हजार फक्त ) |
| ४ | योजना राबविणारी यंत्रणा/अंमलबजावणी अधिकारी | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ५ | नियंत्रक अधिकारी | अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास |
| ६ | योजनेचा उद्देश | पारधी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प असल्याने शासनाच्या विविध योजनांबाबत त्यांना ज्ञान नसल्याने ते योजनांपासून वंचित रहातात करिता त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत पारधी वस्तीमध्ये जाऊन जाणिव जागृती मेळाव्याचे आयोजन करुन त्यांना योजनेची माहिती पारधी जमातीच्या लाभार्थ्यांना देणे व त्यांचेमध्ये जागृती निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. |
| ७ | लाभार्थी निवड पध्दती | प्रकल्प अधिकारी हे पात्र लाभार्थ्यांची निवड करतील. |
| ८ | योजनेचे कार्यक्षेत्र | राज्यातील पारधी समाजाशी संबंधीत जिल्हे |
| ९ | योजनेची कार्यपध्दती | राज्यात जिल्हयामध्ये ज्या ठिकाणी आदिवासी पारधी जमातीचे जास्तीत जास्त वास्तव्य आहे अशा ठिकाणी चार ते पाच गावांचे मध्यवर्ती ठिकाण निवड करुन प्रकल्प अधिकारी हे सदर ठिकाणी जनजागृती मेळावा आयोजित करतील. यासाठी प्रसिध्दी देण्यात येऊन पारधी समाजाच्या कार्यकर्त्यांची मदत घेऊन जास्तीत जास्त पारधी समाजाच्या लोकांना कार्यकर्त्यांच्या मदतीने मेळाव्यात उपस्थिती वाढविण्याचे प्रयत्न केले जातील व स्वत: शासनाच्या विविध योजनांची माहिती त्यांना देतील व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांगिण विकास साधण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व बाबींची माहिती त्यांना करुन देतील. |
| १० | योजनेचा कालावधी | सन २००८-०९ |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) मेळाव्याचे ठिकाण पारधी लोकांना येण्याजाण्यास योग्य अशा ठिकाणी असावे.<br>२) मेळाव्यास जास्तीत जास्तीत जास्त पारधी समाजाचे कार्यकर्त्यांचा सहभाग राहील याची दक्षता घ्यावी.<br>३) जास्तीत जास्त पारधी समाजाच्या लोकांना याचा फायदा होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.<br>४) मेळाव्याचे ठिकाणी पारधी लोकांना माहितीपत्रके तथा इतर माहितीच्या कागदपत्राचे वाटप करावे.<br>५) जमिन हस्तांतरण, वेठबिगर निर्मुलन, अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच नवसंजीवन योजना, आरोग्याच्या योजना व इतर विविध योजनांबाबतची इत्थंभूत माहिती मेळाव्यात देण्यात यावी.<br>६) अंमलबजावणी अधिकारी यांनी मासिक /त्रैमासिक प्रगतीचे व खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे कार्यालयास वेळोवेळी सादर करावे. |

.........